आम्ही पार्लेकर
१९९१ पासून
प्रतिबिंब बदलत्या पार्ल्याचे

या अंकात
पान ०३ गोष्ट ग्राफिक आर्टिस्टची
पान ०५ डोंगरी बालसुधारगृहाचे सुशोभीकरण!
पान ०७ रमैया वस्तावय्या
पान ०९ विसरलेले समाज - २ :टुलोर



पान २
व्यापारामध्ये विजय - एक अनुभवी उद्योजक
लोकेश शेवडे

वर्ष ३२ वे अंक सहावा पृष्ठे १२ जून २०२३ www.parlekar.com Registered-RNI no. 54781/92

# साठये महाविद्यालयात मल्टी स्पोर्ट टर्फ







पार्ले टिळक विद्यालय असोसिएशनच्या साठये महाविद्यालयाने असोसिएशनच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी मल्टी स्पोर्ट टर्फ आणि स्टँडर्ड बास्केटबॉल कोर्ट विकसित केले आहे. या टर्फचा उद्घाटन सोहळा दिनांक १८ मे २०२३ रोजी पार पडला. या सोहळ्याला ४०० खेळाडूंसोबत PTVA संचालक मंडळाचे सदस्य, संस्थेच्या सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य , शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, प्राचार्य आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. पार्ले टिळक विद्यालय असोसिएशनचे अध्यक्ष श्री. अनिल गानू, मानद सचिव श्री. दिलीप पेठे आणि साठये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव राजवाडे यांनी साठये महाविद्यालयाच्या प्रशस्त मैदानाचे आधुनिकीकरण करण्याचे ठरविले जे सर्व हंगामात वापरता येईल. एक बहुउद्देशीय योजना आखून महाविद्यालयातील मैदानात टर्फ तयार करण्यात आले. या टर्फसाठी साठये महाविद्यालयाचे क्रीडा संचालक श्री. अभितसेन वर्तक यांनीही वेळोवेळी मार्गदर्शन केले. पावसाळ्यात पावसाच्या पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टीमचा एक भाग म्हणून स्टॉर्म वॉटर ड्रेनेज सिस्टीम बांधून समाज आणि पर्यावरणासाठी साठये महाविद्यालयाने मोलाचे योगदान दिले आहे. सदर मल्टीस्पोर्ट टर्फमध्ये दोन व्हॉलीबॉल कोर्ट, कबड्डीची दोन मैदाने आणि एक खो खो मैदाने अशा सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत त्याचबरोबर या टर्फवर फुटबॉल, हँडबॉल, बॅडमिंटन, हॉकी हे खेळ खेळता येतील. तसेच साठये महाविद्यालयात स्वतंत्र बास्केटबॉल कोर्टही तायर करण्यात आले आहे. बास्केटबॉल कोर्टवर लॉन टेनिस तसेच ओपन एअर बॅडमिंटनही खेळता येईल.



## संपादकीय

गेल्या काही वर्षात सामाजिक माध्यमांचा प्रभाव वाढत आहे. हातातील मोबाईलच्या एका क्लिकवर सेवेला तत्पर असणारे Facebook, WhatsApp झालेच तर Twitter हे ॲप्स, त्यामधून २४x७ आदळणारी जगभरातील माहिती, मते मतांतरे, वेगवेगळ्या चांगल्या वाईट, खऱ्या खोट्या क्लिप्स, ह्या सगळ्यात आपण आकंठ बुडून गेलो आहोत. व्यक्त होणे हा एक पर्याय नसुन तो आपला हक्क आहे असा आपला समज झाला आहे. हे आभासी जगच आपल्यासाठी इतर कुठल्याही गोष्टीपेक्षा महत्वाचे झाले आहे. आपले काम, नातेसंबंध, आपले भावविश्व, ह्या सर्वांनाच सामाजिक माध्यमांनी ग्रासून टाकले आहे.

खरे म्हणजे सामाजिक माध्यमांची उपयुक्तता वादातीत आहे. क्षणार्धात जगाच्या कुठल्याही कोपर्यात बातमी पोहोचवण्याची, तुमच्या आवडीप्रमाणे माहितीचे वर्गीकरण करण्याची क्षमता, ह्यामुळे आपल्याला दुनिया 'मुठ्ठीमें' आल्याची भावना होणे सहाजिक आहे. आज कॉरपोरेट क्षेत्रातसुद्धा 'डिजिटलायझेशन' हा परवलीचा शब्द झाला आहे. WhatsApp ही संपर्काची प्रमुख प्रणाली झाली आहे. सामाजिक माध्यमांचा वापर जाहिरातींसाठी मोठ्या प्रमाणात होत आहे. कोरोना महामारीत काही काळासाठी वर्तमानपत्रे बंद होती. त्या काळात आपली बातम्यांची भूक सामाजिक माध्यमेच भागवत होती. जे खरे आहे ते नाकारण्यात काहीच हशील नाही.

हे सर्व जरी मान्य केले तरी सामाजिक माध्यमांच्या दुसर्या बाजुकडे दुर्लक्ष करणे योग्य ठरणार नाही. समाजात गैरसमज, खोट्या बातम्या, अफवा, अनैतिक गोष्टी पसरवण्यासाठी, मित्रांमध्ये भांडणे लावण्यासाठी ह्याच माध्यमांचा सर्रास वापर होत असतो हेही तितकेच खरे आहे. स्वत:ला सामाजिक म्हणवणाऱ्या माध्यमांनाही असामाजिक बाजू असतेच !

कुठलेही तंत्रज्ञान हे दुधारी शस्त्र असते. योग्य प्रकारे वापरले तर फायदाच फायदा पण अयोग्य पद्धतीने वापरले तर भयंकर नुकसान. जे तंत्रज्ञान अणूऊर्जा तयार करते तेच तंत्रज्ञान वापरुन अणूबॉंबही तयार करता येतो. सामाजिक माध्यमांचेही असेच आहे, नाही का !

मी दर वेळी पार्ल्याचे तुणतुणे वाजवतो, ह्यावेळी थोडा वेगळा आलाप !

आम्ही पार्लेकर

संपादक
ज्ञानेश चांदेकर

संपादकीय सहाय्य
तानिया गायकवाड
editorial@parlekar.com

जाहिरात व्यवस्थापन
भावेश शिंदे
marketing@parlekar.com

सजावट व मांडणी
विश्वास महाशब्दे – ऐस ग्राफिक्स

निर्मिती
अनिता चांदेकर

www.facebook.com/AamhiParlekar http://aamhiparlekarblog.wordpress.com
कार्यालय : १, अल्फा, महात्मा गांधी मार्ग, विलेपार्ले (पूर्व), मुंबई-४०००५७.
फोन : २६१२२४७५ / २६१९२३७६ / ई-मेल : info@parlekar.com वेबसाईट www.parlekar.com

# व्यापारामध्ये विजय - एक अनुभवी उद्योजक

काही जणांना जन्मजातच व्यवसायाची आवड असते. तर काहीजण मोठे होताना व्यवसायाची ओढ निर्माण होते. पण काहीजण चक्क अपघाताने त्यात पडतात. जसे आपले आजचे मान्यवर श्री. लोकेश शेवडे. पार्ले टिळक आणि पार्ला कॉलेजच्या वातावरणात वाढताना लोकेश यांना आपण उत्पादन - उद्योगात पडू असे वाटले नव्हते. त्यांचा कल होता नाटक, संगीत या कलांमध्ये रमणारा. विजय बोंद्रे, विनय आपटे, चंदू मेहेंदळे या मित्रपरिवारात नाटकासाठी सक्रिय असणारे लोकेश शेवडे. त्यांच्या वडिलांचे (बाबूजींचे) काही मित्र आणि काही नातेवाईक यांनी एक छोटेसे इलेक्ट्रोप्लेटिंगचे युनिट (सरगम इंडस्ट्रीज) नाशिकला सुरू केले होते त्यात त्यांना आर्थिक सहाय्य म्हणून बाबूजींनीही काही गुंतवणूक केली. तथापि, त्या युनिटला सतत काही ना काही अडचणी, आपत्त्या येत गेल्या आणि कर्ज वाढत गेले. या काळात वाढीव मनुष्यबळ म्हणून लोकेश देखील तिकडे गेले. नाशिकला आल्यावर त्यांच्या लक्षात आले की सदर व्यवसाय आत्यंतिक दुरावस्थेत होता. तो विकायची पाळी आली होती पण विकलाच जात नव्हता. म्हणून तो व्यवसाय लोकेशजी चालवण्याचा प्रयत्न करू लागले. हळूहळू नवीन ऑर्डर्स मिळू लागल्या पण काही ना काही तांत्रिक - आर्थिक अडचणी येतच होत्या. त्यावेळी ऑर्डर्स मिळवणे, त्याचे उत्पादन (प्रक्रिया) करणे, त्याची डिलिव्हरी देणे हे सर्व काही लोकेश यांना एकट्यालाच करायला लागत होते. अर्थातच, त्यात कुठे ना कुठे काही ना काही संकटे येऊन पुन्हा धडपडायला होत असे. आज मागे वळून बघताना लोकेशजी त्या सर्व स्वत: करण्याच्या प्रकाराला उद्योग - व्यवसाय न म्हणता गमतीने 'स्वयंरोजगार' म्हणतात. पहिली दोन-चार वर्ष अतिशय जिकरीची गेली. पुढे मागणी खूप वाढली, परंतु तेवढं उत्पादन जमत नव्हतं. अशा वेळी ८४ साली आधार देण्यासाठी वडील बाबूजी 'कॅस्ट्रॉल' मधून निवृत्ती घेऊन नाशिकला आले. मोठ्या कंपनीत काम करण्याचा अनुभव त्यांच्या गाठीला होता त्यामुळे त्यांनी संपूर्ण व्यवसायाला शिस्त लावली. बाबूजी कारखाना - उत्पादन व लोकेश मार्केटिंग सांभाळू लागले. लोकेश यांच्या वडीलांनी सर्व कारखान्याला एक चाकोरी (सिस्टीम) लावून दिली. ती व्यवसायाच्या सर्व विभागात पाळली जाऊ लागली. परिणामत: आलेल्या अडचणी नियंत्रणात आल्या आणि नाशिक बाहेरून - विशेषत: औरंगाबादहून मागणी येऊ लागल्यामुळे विस्ताराची गरज भासू लागली. त्याच वेळी धाकटा भाऊ देवेश आणि चुलत भाऊ सुधांशू यांना देखील उद्योग सुरु करण्याची इच्छा झाली. त्यामुळे औरंगाबादला इलेक्ट्रोप्लेटींग युनिट सुरू करून ते दोघंही व्यवसायात सहभागी झाले. एव्हाना व्यवसायाची गाडी रुळावर येऊन तिने वेगही धरला होता.



या नंतर प्लास्टिकच्या (पाण्याच्या) टाक्या बनवाव्या असं लोकेश यांच्या मनात आलं त्याच काळात त्यांचे आतेभाऊ श्री शंतनू भडकमकर जे स्वत: प्रथितयश व्यवसायीक होतेच (त्यांनी नंतर महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष पद भूषवले आहे) हे काहीतरी वेगळ्या उद्योगाची सुरुवात करायचा विचार करत होते. दोघांनी मिळून रोटोमॅटिक कंटेनर्स प्रा.लि (टाक्यांचे उत्पादन बनवणारी) ही कंपनी अंबड (नाशिक) येथे सुरू केली, ज्यांची उत्पादने आज 'स्टोअरवेल' या नावाने ओळखली जातात. यात पाण्यासाठी रुफ टँक - लॉफ्ट टँक, शेतीमधल्या फवारणी साठी ॲग्रो टँक, केमिकल स्टोरेज टँक व लिटर बिन, व्हील बॅरो, बायोगॅस संयंत्र वगैरे उत्पादने बनवली जातात. 'स्टोअरवेल' टाक्यांना आयएसआय मानक चिन्ह प्राप्त असून त्यांच्या वितरकांचे महाराष्ट्रभर जाळे पसरले आहे.

पुढच्या काळात नाशिक मध्ये प्लेटिंगची मागणी वाढायला लागल्यावर देवेश औरंगाबादहून नाशिकला आला आणि त्याच्या पुढाकाराने सिन्नर येथे 'आलाप एंटरप्राइझेज' नावाने आणखी एक युनिट सुरू करण्यात आले. हे युनिट ऑटोमॅटिक प्लेटिंग करणारे उत्तर महाराष्ट्रातील पहिलेच युनिट होते.

एव्हाना व्यवसाय भरभराटीस येऊ लागला होता, पण त्यात औद्योगिक आरोग्य व वाढीचा वेग उत्तम ठेवण्यासाठी मॅनेजमेंटच्या शिक्षणाची उणीव (पूर्वतयारी नसताना अचानक जबाबदारी अंगावर आल्याने) भासू लागली. त्या काळात नाशिकचे प्रथितयश उद्योजक श्री. राजेंद्र बागवे, हे 'बिझनेस एक्सलन्स' साठी 'टीचिंग अँड लर्निंग कम्युनिटी' (टी.एल.सी) या आगळ्या वेगळ्या संस्थेची उभारणी करत होते. त्यात लोकेश व देवेश यांनी सामील होऊन प्रशिक्षण घेण्यास सुरुवात केली. त्यातून मार्केटच्या तीव्र स्पर्धेत स्टाफ, कामगार यांच्यासह उद्योगाचा उत्कर्ष कसा साधावा हे शिकता आले ज्याचा व्यवसायाला प्रचंड फायदा झाला.

आता सर्व युनिट्स बऱ्या पैकी मार्गी लागल्या होत्या. मागणी वाढती राहून व्यवसायाची सुदृढ वाढ होत होती. मागणीप्रमाणे काम तेही गुणवत्तापूर्ण व वेळेवर, सुरळीतपणे पोहोचत होते. म्हणूनच इलेक्ट्रोप्लेटिंगचे काम करून घेण्यासाठी स्नायडर, एबीबी, ह्यूसंग, सारख्या मोठ्या व आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या ऑर्डर सतत मिळू लागल्या. अशा वेळी, लोकेश यांची मुलगी 'स्निग्धा' देखील व्यवसायात सहभागी झाली. तिच्या सहभागानंतर नाशिकमधील सातपूर, सिन्नर सह बडोदा, चाकण येथे शाखा विस्तारत गेल्या.

लोकेश यांच्या पत्नी सौ. संध्या शेवडे याही जन्मजात पार्लेकरच. पण अचानक नाशिक सारख्या त्यावेळी फारच लहान शहरात जाऊन स्थायिक होणे एकूणच सामाजिक व सांस्कृतिक बदलाला तोंड देणे त्यांनी खंबीरपणे पार पाडले. दोन जुळ्या मुली स्निग्धा व मुग्धा. यातील मुग्धा लग्न होऊन कॅनडा येथे स्थाईक झाली तर स्निग्धाने प्रथम मास मीडियात शिक्षण घेतले व अचानकच व्यवसायात यायचे निश्चित केले. लग्नानंतर काय होईल याचाही फार विचार न करता एकीकडे काम करताना फॅमिली बिझनेस मॅनेजमेंट चा कोर्स केला व नंतर २०१८ मध्ये हार्वर्ड युनिव्हर्सिटीला जाऊनही शिक्षण घेतले. आज स्निग्धा व तिचे पती केदार भावे अमेरिका सोडून भारतात येऊन पूर्णपणे व्यवसायाची धुरा सांभाळत आहेत. मुलगी, जावई यांच्यावर व्यवसायाची जबाबदारी देऊन लोकेश व देवेश फक्त आता धोरणात्मक किंवा कायदेशीर बाबींकडे लक्ष देतात. एका मोडकळीला आलेल्या व्यवसायातून आज ४५ वर्षांनंतर 'सरगम इंडस्ट्रीज' (सातपूर), 'आलाप एंटरप्राइझेज ' (सिन्नर), 'सरगम इलेक्ट्रोप्लेटर्स प्रा. ली' (बडोदा), 'सरगम कोटर्स प्रा. ली' (चाकण) आणि 'रोटोमॅटिक कन्टेनर्स प्रा. ली' (अंबड) एवढ्या कंपन्या उभ्या राहिल्या आहेत. लोकेश यांनी स्वत:ची संगीताची आवड कंपनीच्या नावांमधून जपताना आपल्याला दिसते. ''प्रथम पासून व्यवसायाचा विचार असणाऱ्यांना, त्यातले शिक्षण घेऊन व्यवसायात उतरणाऱ्यांना कदाचित व्यवसाय वाढवणे सोपे जात असेल, कमी अडचणींना तोंड द्यावे लागत असेल. पण आमच्या सारख्या अपघाताने त्यात पडलेल्या पण नंतर नेटाने उभे राहणाऱ्यांना वास्तवाला तोंड देत, शिकत पुढे जावे लागते व त्यामुळे कदाचित थोडा जास्त वेळ लागतो. पण नेटाने काम केले तर यश नक्की मिळते.'' असे लोकेश यांचे विचार आहेत.

आता व्यवसायाची जबाबदारी कमी झाल्याने ते पुन्हा एकदा त्यांच्या जुन्या छंदांकडे वळले आहेत. लिखाण व संगीत, नाट्य या त्यांच्या जुन्या आवडी जोपासतानाच 'अर्वाचीन इतिहासाचा' अभ्यास, त्यासाठी वेगवेगळे देश पर्यटन व त्यावरील लिखाण यात ते मग्न आहेत. कुसुमाग्रज प्रतिष्ठानचे त्यांनी कार्यवाह म्हणून काम बघितले आहे. लोकेश यांचा हा व्यवसाय प्रवास नक्कीच पार्लेकरांना मार्गदर्शक ठरावा.



संगीता बेहेरे
९८६७७५८३१०

# गोष्ट ग्राफिक आर्टिस्टची

गार्गी भालेरावचा जन्म आणि शालेय शिक्षण पार्ल्यात झालं.

गार्गी महिला संघ शाळेची विद्यार्थिनी. दुसरी



तिसरीत असल्यापासूनच तिला चित्रकलेची आवड निर्माण झाली. खरं तर लहान मुलं किती चंचल असतात, पण त्याही वयात चित्र काढायला घेतलं की पूर्ण करेपर्यंत ती खाली ठेवत नसे. पाचवीत तिने कलानिकेतन बालकला केंद्राच्या स्पर्धेत भाग घेऊन पहिलं बक्षीस मिळवलं आणि हाच क्षण गार्गीच्या आयुष्यातला टर्निंग पॉइंट ठरला. मग सातवी-आठवीत शैला मसुरेकर बाईंकडे चित्रकला शिकून तिने एलिमेंटरी परीक्षेत दुर्मीळ अशी ए ग्रेड आणि इंटरमीडिएट परीक्षेत बी ग्रेड मिळवली.

चित्रकलेव्यतिरिक्त गार्गीने सुलभा देशपांडे यांच्या 'आविष्कार-चंद्रशाला' या संस्थेच्या 'दुर्गा झाली गौरी' आणि 'पंचतंत्र' ह्या गाजलेल्या बालनाट्यांमध्ये दहा वर्षे भूमिका केल्या. तिच्या ह्या सर्व कलागुणांना तिच्या आईनं खूप प्रोत्साहन दिलं. चित्रकलेशी निगडित क्षेत्रातच करियर करायचं हे मनात पक्कं असल्याने शालेय शिक्षण झाल्यावर तिनं दादरच्या मॉडेल आर्ट इन्स्टिट्युटमध्ये फाऊंडेशन कोर्स केला. त्यानंतर सहा वर्षे ॲनिमेशन क्षेत्रात काम केले. 'वोडाफोन झूझ्यु' या त्या काळच्या मोठ्या कॅम्पेनमध्ये तिचा सहभाग होता. त्यानंतर काही काळ तिने ॲड एजन्सीत कामाचा अनुभव घेतला आणि त्यानंतर इव्हेंट मॅनेजमेंट कंपनीत थ्रीडी सेट डिझायनर म्हणून जबाबदारी सांभाळली. मग




२०१७ साली तिने परळच्या नामांकित ISDI संस्थेत ग्राफिक डिझाईनचा ॲडव्हान्स कोर्स केला ज्यामुळे चित्रकला आणि कल्पकता साथीला असली तरी त्यातील तंत्र व बारकावे समजण्यास मदत झाली.

त्यानंतर गार्गी स्वतंत्रपणे ग्राफिक सल्लागार म्हणून काम करू लागली. तिची काही उल्लेखनीय कामे म्हणजे रामरतन ग्रुपसाठीचं प्रॉडक्ट डिझाईन, देवदत्त पटनाईक यांच्या एपिक चॅनलवरील 'देवलोक' कार्यक्रमासाठी पौराणिक पात्रांची इलस्ट्रेशन्स आणि वेस्टलॅंड पब्लिकेशन्सतर्फे प्रिती शेणॉय यांच्या पुस्तकांसाठी काढलेली इलस्ट्रेशन्स असं म्हणता येईल.

हे सर्व करत असताना गार्गीचे एक स्वप्न तिला स्वस्थ बसू देत नव्हतं. ते म्हणजे स्वत:ची कला सर्वांसमोर आणण्यासाठी स्वत:च्या ब्रॅंडची निर्मिती करणे. नवलाची गोष्ट म्हणजे भर लॉकडाऊनमध्ये गार्गीने 'कुंचलाकारी' हा स्वत:चा ब्रॅंड काढला. त्याद्वारे तिने स्वत:ची डिझाईन्स टी कोस्टर, फ्रीज मॅग्नेट्स, नोटपॅड्स, स्केचिंग बुक्स, फोटो फ्रेम अशा सुंदर व उपयोगी वस्तूंच्या माध्यमातून सर्वांसमोर आणली. मागच्या वर्षी विलेपार्ले कार्निव्हलमध्ये तिने भाग घेतला त्याला खूप चांगला प्रतिसाद मिळाला. तिच्या ब्रॅंडला ऑनलाईनही भरपूर मागणी आहे. www.kunchalakari.com हे तिच्या वेबसाईटचं नाव.

सध्या ती पार्ल्यात देशपांडे - टेस्ट फॉर लाईफ यांच्या कंपनीत क्रिएटिव्ह हेड म्हणून काम



करते व त्याचबरोबर कुंचलाकारी ब्रॅण्डला मोठं करण्याचा तिचा मानस आहे. कलेच्या वाटेवरील गार्गीचा प्रवास असाच बहरत राहावा अशा तिला शुभेच्छा.



सविता दामले
९९३०३ ११५४६



# रंगुनी रागांत साऱ्या

## मारू बिहाग

हा राग आरोहात बिहाग आणि अवरोहात कल्याण (तीव्र मध्यम) या रागांचे मिश्रण म्हणता येईल. काही रागांची ओळख ही काही विशिष्ठ कारणांनी होते. त्यातलाच हा 'मारू बिहाग'. आम्ही शाळेत होतो, त्यावेळी जरी मुली वर्गात असल्या तरी त्यांच्याशी बोलणे हा फाऊल मानला जायचा वर खाली जायचे जिनेसुद्धा वेगळे असायचे. अर्थात नंतर सुद्धा IIT इंजिनीरिंग हा तसा वाळवंटी प्रदेशच. असो.

नुकतीच मिसरूड फुटायला लागली होती आणि अजून adult मुव्हीला officially एन्ट्री नव्हती. त्या काळी प्रभा अत्रे क्लासिकल म्युझिक मध्ये फेमस झाल्या त्यांचा मारुबिहाग, कलावती वगैरे चा अल्बम लोकप्रिय झाला. त्यातली 'जागू मै सारी रैना बलमा' ही विशेष श्राव्य. आम्हाला लहानपणी द्रुत जास्त आवडायचं. बडा ख्याल, विलंबित वगैरे प्रकरण जरा बोरिंग वाटायचं . गाणे आवडायला त्या काळी काव्य अर्थपूर्ण असावं लागायचं. गाण्यात का होईना कोणीतरी आपल्यासाठी रात्रभर जागतंय ही फीलिंग खुपच लुभावनी असायची. असही असतं बुवा, मजा आहे अन काय! त्यात पुढे 'बहुत रमायो सौतन घरमा'. इथे एखादी स्मितरेषा महाग तिथे साजन दुसरीकडे गेला म्हणून झुरणारी सुंदरी..... तीन तालाचा सुंदर ठेका आणि सुटसुटीत छान काव्यं, एकंदरीतच हा 'मारू बिहाग' आवडायला लागला. द्रुत वरून मग मला हळू हळू विलंबित ख्याल गायकी थोडी आवडायला लागली. 'कल नाही आये' पासून पद लागले तरी बंद करावसं नाही वाटल. एकदा सहज त्याच्यावरून 'तुम तो प्यार हो सजना' आठवलं. थोडं विचारल्यावर ते याच रागात आहे असं कळलं. भारी वाटलं. पुढील दोन दिवस दिसेल त्याला हे गाणे कुठच्या रागात आहे हे विचारत होतो. तो माहित नाही असं म्हणाला कि मी जोरात, ''अरे मारुबिहाग'' असं बोलायचो.

या गाण्याच्या चित्रीकरणात spectacular असं काहीही नाही, अर्थात माझ्यामते. हिरोईन संध्या हे एक कारण पुरेसे आहे, पण बघा म्हणजे हिरो कोण माहित नाही. 'सेहरा' चित्रपट तसा सुमार , संगीत दिग्दर्शक रामलाल फारसे प्रसिद्ध नाहीत, चित्रपट वाळवंटात चित्रित केलाय. मला नृत्य या कलेत विशेष कळत नाही (कशात कळत हा पण एक प्रश्न आहे ), पण नाच म्हणून जे काही आहे ते.... जाऊदे. तरी गाणं अजून ओठांवर येत. केवळ मारू बिहाग लक्षण गीत म्हणून.

मारू बिहाग मधील इतर गाजलेली गाणी.

'पायल वाली देख ना, यहीपे कही दिल है पग तले आये ना.'

किशोर कुमारनी काही थोडी क्लासिकल गाणी गायली आहेत, हे त्यापैकी एक. चित्रगुप्त यांनी संगीतबद्ध केलेले गाणे किशोरच्या उत्तम गायकीचा नमूना आहे. कुठचेही संगीताचे शास्त्रीय शिक्षण न घेता किशोर कुमार ने अगदी पट्टीच्या गायकाच्या तोडीचे गायले आहे.

'दिल जो ना केह सका..'

रफी अद्वितीय, रोशन यांचे संगीत. हे गाणे लता आणि रफी यांच्या दोघांच्याही आवाजात आहे. अप्रतिम वाद्य साथ आणि गायकी, पण पडद्यावर दगड प्रदीप कुमार मुळे थोडा रसभंग होतो.

'मतवाली नार ठुमक ठुमक चली जाये..'

इथे वहिदा रेहमान छान नाचते आणि सुनील दत्त तिच्यापुढे नाचात अगदी तोकडा पडतो. तो अर्थात प्रयत्न ही करत नाही जास्त.

मराठी संगीतकारांनी या रागावर फारशी पसंती दाखवली नाही, एक दोन अपवाद सोडल्यास. 'का धरिला परदेश' हे अभिषेकी बुवांनी संगीत दिलेले नाट्य गीत आणि एक यशवंत देवांचे कवी अनिल यांचे अतिशय सुमधुर 'केळीचे सुकले बाग'. हे गाणे उषा मंगेशकर यांनी खूपच छान गायले आहे. पण दोन दिग्गज बहिणी समोर असूनसुद्धा उषा ताईंना या गाण्यासाठी देवांनी का घेतले असावे हे एक कोडेच आहे. असो.



मिलिंद जोशी
९८१९७ ९७२५८

## श्रिया भागवतला 'सर्वोत्कृष्ट लेखक' पुरस्कार!

मूळची पार्लेकर असलेली श्रिया भागवत निर्मित व लिखित 'Mr. Singh's Death' या लघुपटाला १ ३ व्या पुणे शॉर्ट फिल्म फेस्टिवल मध्ये Best International Writer (Screenplay) हा पुरस्कार प्राप्त झाला.
श्रियाने हा पुरस्कार तिच्या सर्व सहकाऱ्यांच्या वतीने पुणे येथे दिनांक २८ मे रोजी संपन्न झालेल्या पुरस्कार सोहोळ्यात स्वीकारला.
याचा छोटासा व्हिडिओ आपण https://youtu.be/GzQuYoVZA8Q या संकेत स्थळावर पाहू शकता.







# डोंगरी बालसुधारगृहाचे सुशोभीकरण!

दक्षिण मुंबईतील डोंगरी या विभागामध्ये ब्रिटिश काळापासून एक भलीमोठी भव्य अशी ऐतिहासिक परंतु दुर्लक्षित वास्तू म्हणजे डोंगरी बाल सुधार गृह आहे. सुमारे १०,००० स्क्वेअर यार्ड एवढ्या मोठ्या विस्तीर्ण परिसरामध्ये हे डोंगरी बालसुधारगृह वसलेले आहे. सन १८०४ मध्ये ब्रिटिशांनी ही वास्तू बांधली तेव्हा त्याचा उपयोग स्वातंत्र्यसंग्रामातील आपल्या स्वातंत्र्यसैनिकांना कैद करण्याकरिता केला जात होता, त्याला उमरखाडी जेल असे नाव होते. या जेलमध्ये १८८२ मध्ये बाळ गंगाधर टिळक आणि गोपाळ गणेश आगरकर तर १९११ मध्ये स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना कैद करण्यात आले होते. स्वातंत्र्यवीर सावरकर यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावल्यानंतर अंदमानला पाठवण्यापूर्वी त्यांच्या पत्नी यमुनाबाई यांच्याशी शेवटची भेट याच कारागृहामध्ये घडली होती. कालांतराने या वास्तूचा उपयोग स्वातंत्र्योत्तर काळामध्ये लहान मुलांसाठी एक वेगळे जेल चालू करण्यात आले त्याला बाल सुधार गृह असे संबोधतात. या ठिकाणी ब्रिटिशांच्या काळापासून अस्तित्वात असलेल्या काही खोल्या जतन करण्यात आल्या आहेत ज्यामध्ये लोकमान्य टिळक,आगरकर आणि सावरकर यांना कैद करण्यात आले होते. त्या खोल्यांमध्ये त्यांच्या तस्वीरी लावून जयंती आणि स्मृतिदिनानिमित्त छोटे मोठे कार्यक्रम घेतले जातात. एका भागामध्ये बाल सुधारगृह आहे आणि एका बाजूला जेलच्या खोल्या आहेत हा सर्व परिसर प्रतिबंधित असल्यामुळे सर्वसाधारण लोकांना या ठिकाणी प्रवेश मिळू शकत नाही. त्यामुळे एवढी मोठी ऐतिहासिक वास्तू दुर्लक्षित राहिली आहे. त्या ठिकाणी सर्वसाधारण लोक दर्शनार्थ किंवा अभ्यासासाठी, माहितीसाठी जाऊ शकत नाही. दुर्दैवाने या जेलच्या इतिहासाबाबत शासकीय स्तरावर फार कमी दस्तऐवज उपलब्ध आहेत. त्यामुळे या जेल बाबत अधिकृत माहिती फार कमी उपलब्ध आहे, या जेलचा इतिहास अंधारातच राहिला आहे. असे असले तरी आता सरकारने तो इतिहास जागवण्याच्या दृष्टीने हे ऐतिहासिक स्थळ सुशोभीकरण आणि सर्वसाधारण लोकांना दर्शनार्थ खुले करण्याच्या दृष्टिकोनातून पावले टाकली आहेत. ही गोष्ट खूपच स्वागतार्ह आहे.






मी मुंबई पोलीस दलामध्ये कार्यरत असताना, सन २०१८ मध्ये सहाय्यक पोलीस आयुक्त या पदावर डोंगरी पोलीस ठाणे येथे माझी नेमणुक झाली. डोंगरी बाल सुधारक हे डोंगरी पोलीस स्टेशन पासून केवळ पाचशे मीटर अंतरावर आहे. त्याचप्रमाणे बाल सुधारगृहात बाल-न्यायालय देखील आहे. त्या ठिकाणी पोलिसांची रेलचेल असते परंतु कोणीही या ऐतिहासिक वास्तू बद्दल माहिती घेण्याचा प्रयत्न केला नाही. माझी नेमणूक झाल्यानंतर मी पहिल्या आठ




दिवसातच बाल सुधारगृहाला भेट दिली त्यावेळेस सौ.पाटील या बालसुधारकाच्या अधीक्षक होत्या. त्यांच्यामार्फत सर्व सुधार गृहाची माहिती घेतली तसेच या ऐतिहासिक वास्तू मधील जतन केलेल्या खोल्यांना भेट दिली, लोकमान्य टिळक आगरकर आणि सावरकर यांच्या तस्वीरीला नमन केले आणि तेव्हाच निश्चय केला की, या ऐतिहासिक खोल्यांना त्यांचे महत्त्व प्राप्त करून देण्याच्या दृष्टीने आणि सर्वसाधारण जनतेला

पान ८ वर






# बारतोंडी

(Morinda tinctoria Roxb/
Family Rubiaceae)

बारतोंडी हा एक मध्यम उंचीचा वृक्ष आहे.

पश्चिम घाट परिसरात सहज आढळणारा हा वृक्ष विलेपार्ल्यातील मालविय रस्त्यावरील पोस्ट ऑफिसच्या लगतच्या गल्लीत शेरेटॉन



क्लासीक ईमारतीच्या जवळ आहे. मोठी काहीशी रुंदीपेक्षा जास्त लांब असणारी पानं बारा महिने दिसतात. फुलं मार्च पासून अगदी पावसाळ्यापर्यंत येतात. संध्याकाळी फुलणाऱ्या फुलांचा मंद, पुषकळसा मोगऱ्यासारखा दरवळ वृक्षासभोवती विशेषकरून संध्याकाळी व रात्री पसरतो फळे टणक व संयुक्त असतात. त्यांवर फुटबॉल सारख्या पंचकोनांची अथवा षटकोनांची नक्षी असते. असे १०-११ षटकोन फळांवर दिसतात व त्यांच्या प्रत्येकाच्या मधोमध एक गोल ठिपका असतो म्हणून 'बारतोंडी' हे नाव तर या वृक्षाचे संस्कृत नाव अक्षिकीफल किंवा अच्युत असे आहे.

या झाडाचे खोड आतून जर्द पिवळे असते. मुळांपासून काढलेला आळता पावलांवर लाल नक्षी काढण्यासाठी वापरतात. साधारण २-३ वर्षे वयाच्या वृक्षाच्या बारीक (१सें. मी. पेक्षा बारीक)मुळांपासून मिळणारा रंग कापूस, लोकर अथवा रेशमी धागा रंगवण्यासाठी वापरतात. वेगवेगळ्या धातूंच्या क्षारांची प्रक्रिया करून (mordanting) वेगवेगळया रंगछटा मिळतात. ॲल्युमिनीयम बरोबर लाल, क्रोमियम बरोबर गर्द तपकिरी व लोखंडा बरोबर काळपट जांभळा रंग मिळतो. पार्ल्यातील हा तसा दुर्लक्षित आणि फारसा माहीत नसलेला वृक्ष आहे.





**श्रीकांत सावरकर**
९२२३३१४९०९

# राहुल पुराणिक यांना भारत गौरव पुरस्कार २०२३ जाहीर!

विलेपार्ले येथील मध्यमवर्गीय, सुशिक्षित संयुक्त कुटुंबात वाढलेले श्री. राहुल पुराणिक हे सॉनी ग्रूप ऑफ कंपनीज चे चेअरमन आहेत. सॉनी ही जागतिक बहुराष्ट्रीय कंपनी आहे जी



हॉस्पिटॅलिटी, डिस्टिलरी, बेव्हरेज रिटेल, रिअल इस्टेट गुंतवणूक, संयुक्त राष्ट्रांसाठी धोरणात्मक खरेदी, एव्हिएशन कार्गो आणि आरोग्यसेवा पुरवठा वितरण अशा सात प्रमुख उद्योगांमध्ये माहिर आहे. सॉनी ग्रुप ऑफ कंपनी फ्रान्स, आयर्लंड आणि सिंगापूर येथील कार्यालयांसह अटलांटा येथे स्थित आहे. राहुलने कोरोना काळात जॉर्जिया राज्यातील आपत्कालीन सेवांना पाठिंबा देण्यासाठी 'सॉनी हेल्थकेअर' ही आरोग्य सेवा कंपनी तयार केली. सॉनी हेल्थकेअरने परदेशातून हँड सॅनिटायझर, मेडिकल किट, मास्क आणि इतर वैयक्तिक संरक्षण उपकरणे कार्यक्षमतेने आयात केली आणि संपूर्ण जॉर्जियातील रुग्णालयांमध्ये वितरित केली त्याचप्रमाणे गेल्या आठ वर्षांपासून राहुल आणि त्यांच्या पत्नी सौ. स्वप्ना पुराणिक समाजातील हायस्कूल आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत आहेत. आतापर्यंत त्यांनी १५० हून अधिक विद्यार्थ्यांसोबत काम केले आहे. राहुल विद्यार्थ्यांना त्यांच्या स्वप्नांचे अनुसरण करण्याचा सल्ला देतात आणि इतर काय करतात ते करण्याऐवजी त्यांच्याप्रमाणेच त्यांचे ध्येय लक्षात ठेवा असे मार्गदर्शन करतात. श्री. राहुल पुराणिक यांनी केलेल्या त्यांच्या आतापर्यंतच्या कार्य आणि कर्तुत्वासाठी त्यांना 'भारत गौरव पुरस्कार २०२३' जाहीर करण्यात आला आहे.


**BECOME A DOCTOR IN PUBLIC UNIVERSITIES, POLAND**

- Coaching in English language
- Medicine, Dentistry,
- Public health and Nursing
- Intake starts in September 2023.
- Limited seats available

**Admissions open for Medical Universities in Poland**



**We are Overseas Education Consultant**

**What we do**

- *Selection of Country Courses & Submission of Applications*
- *University admissions.*
- *Bank loan*
- *Visa Application*
- *Overseas Student accommodation.*
- *Test preparation coaching for IELTS. TOFEL. PTE. GRE. And GMAT.*
- *Forex Transfer.*
- *Internship programs for Australia and USA*

Contact : D B Kale.
: +91 9870499953

Highgate Academy (India)

info@haindia.com
www.haindia.com

Design by

# रमैया वस्तावय्या

सदाबहार

लहानपणी गाण्याच्या भेंड्या खेळताना 'र' हे अक्षर कायम रडकुंडीला आणत असे. पण कधीही नव्या दमाने खेळ चालू करताना अगदी पहिल्यांदा 'र' अक्षर आलं, की 'रमैय्या वस्तावय्या' या गाण्याने खेळाची सुरुवात होत असे.

'श्री ४२०' या चित्रपटातलं हे गीत. या गाण्याचे गीतकार शैलेंद्र आणि संगीतकार शंकर जयकिशन. ख्वाजा अहमद अब्बास यांनी लिहिलेला आणि निर्माता, दिग्दर्शक, अभिनेता राजकपूर यांचा मनोरंजक चित्रपट श्री ४२०. राज सक्सेना हा गरीब, अनाथ परंतु बुद्धिमान मुलगा



कामाच्या शोधासाठी मुंबईत येतो. गंगामाई त्याला फुटपाथ वरच, पण प्रेमाचा आसरा देते. आल्या आल्या राज विद्या नावाच्या गरीब पण आपल्या तत्त्वांवर ठाम असणाऱ्या मुलीच्या प्रेमात पडतो. भरपूर पैसे कमावून पत्नी आणि मुलांना उत्तम आयुष्य देण्याच्या विचाराने झपाटलेला राज नकळत मुंबईतील मोहमयी दुनियेच्या जाळ्यात अडकतो. पैशाची चटक लागून ४२० बनतो. विद्या त्याला या मार्गावरून परावृत्त करण्याचा खूप प्रयत्न करते. शेवटी दु:खी होऊन त्याच्यापासून दूर जाते. मोह 'मायेच्या' जाळ्यात अडकून तो आपल्या 'विद्याला' हरवून बसलेला असतो. शेवटी त्या झगमगत्या दुनियेकडे पाठ फिरवून आपल्या लोकांमध्ये म्हणजे आपल्या फूटपाथ वरच्या दुनियेत परत येतो. तिथली साधी कामकरी मंडळी दिवसभराच्या कष्टाच्या कामानंतर नाच गाण्यात विरंगुळा शोधतात. 'रमैय्या वस्तावय्या'

कुणा रमैय्या वस्तावय्या ला उद्देशून असलेलं हे गाणं वास्तवात आपल्या कथा नायकाला उद्देशून आहे.'नैनो में थी प्यार की रौशनी, तेरी आखों में ये दुनियादारी न थी..' अशा एक से एक ओळी शैलेंद्र च्या. वस्ती वाले आपापली कामं आवरून हळु हळु निवांत जमत आहेत आणि हे सारं सेठ सोनाचंद च्या हवेली समोर. झगमगत्या मुंबई ची दोन पूर्ण विरोधाभासी रूपं दाखवली आहेत राज कपूर ने .. पुढचं दृश्य.. रात्र चढतेय, चुकार प्रवासी घरी निघालेत. हळु हळु पहाट होतेय. मुंबईचा सुप्रसिद्ध दूधवाला नर्गिस अजुन जागीच आर्त स्वरात गातोय 'वही से दूर से ही तू भी ये कह दे कभी..मैंने दिल तुझको दिया..' आता राज गातोय 'एक तारा ना जाने कहाँ छुप गया..' आणि गंगामाई म्हणतेय, 'मैंने दिल..' नृत्यात दंग वस्तीचं उत्कृष्ट चित्रण. जितक्या वेळा मैंने दिल तुझको दिया येतं, वेगळ्या व्यक्तीच्या तोंडून आणि संदर्भात. रमैय्या वस्तावय्या गाण्यात मोहम्मद रफी यांचा आवाज आहे पण तो नर्तकासाठी. नर्गिसच्या मनाची कैफियत सांगणारा आवाज लताबाईंचा तर राज साठी दु:खाने भिजलेला स्वर मुकेशचा गाण्यातली देखणी तरतरीत नर्तिका शीला वाझ.

C. I. D. चित्रपटातील 'लेके पहला पहला प्यार' सारख्या गाण्यांतून गाजलेली. बाकी कलाकारांचं नृत्य ही जोशपूर्ण. ज्याच्यावर मनापासून प्रेम केलं तो दूर गेला आणि संसाराचं स्वप्न उध्वस्त झालं, यामुळे दु:खी नर्गिस सर्वस्व हरपलेला राज आणि मैंने दिल तुझको दिया म्हणत राज वर प्रेमाची पाखर घालणारी गंगामाई.. अविस्मरणीय असं गाणं.

आता या गाण्याच्या पहिल्या दोन



शब्दांविषयी. ही एक मजेशीर कथा आहे. चित्रपटाचं संगीत करताना राज कपूर ची म्युझिक टीम खंडाळ्याला जाऊन राहात असे. खंडाळ्याला जाताना वाटेत एके ठिकाणी चहा नाश्त्यासाठी थांबत असे. तिथे रामैय्या नावाचा तेलुगु नोकर काम करत होता. संगीतकार शंकर यांना तेलुगु भाषा अवगत होती. त्यामुळे ते त्याच्याशी नेहमी तेलुगु त बोलत आणि त्याला च ऑर्डर देत. असंच एकदा शंकर ने हाक मारली. पण रामैय्या कामात होता म्हणून त्याने जरा थांबा अशी खूण केली. पण त्याला वेळ लागू लागला त्यामुळे वैतागून शंकर यांनी रामैय्या.. रामैय्या अशी हाक मारून शेवटी.. रामैय्या वस्तावय्या.. असं टेबल वर ताल धरून गुणगुणायला सुरुवात केली. म्हणजे रामैय्या लवकर ये. त्यांच्या त्याच त्याच बोलण्याला हसरत जयपुरी कंटाळले. ते ही या चित्रपटाचे गीतकार. शैलेंद्रना म्हणाले, एवढं च ? पुढे काही नाही ? शैलेंद्र नी तत्परतेने शब्द जोडले, मैंने दिल तुझको दिया..दोन चार वेळा गुणगुणल्यावर सर्वांच्या लक्षात आलं हे एक छान गाणं होईल. मुंबईत परतल्यावर या दोन ओळी राज कपूरला ऐकवण्यात आल्या. तो ही खूष झाला. गाणं तयार झालं. आता पहिल्या दोन शब्दांचा प्रश्न आला. ते काढून हिंदी शब्द घालण्याची खटपट सुरु झाली. पण कोणतेही शब्द बसेचनात. शेवटी मूळ शब्द तसेच ठेवले आणि गाणं रेकॉर्ड झालं.



**अनुश्री क्षीरसागर**
**९८२०५०९७६२**


chitr kathhi



**आर्ट रसिकांसाठी नवीन पर्वणी .**
सकाळी ११ ते संध्यकाळी ७ वाजे पर्यंत .
४०२, आकृती ओरियन बिल्डिंग .
आकृती एरिका च्या समोर,
श्रद्धानंद रोड , विले पार्ले ( पूर्व ),
मोबाईल नंबर ९३२१३९५५१४,९८९२१५५६८०



येथे **चित्रकथी आर्ट गॅलरी** सुरु केली आहे. ह्या गॅलरींच्या संचालक वास्तू विशारद आणि जे .जे. कॉलेज आणि आर्किटेक्चरच्या माजी विद्यार्थीनी **अनुराधा रायकर** आहेत .त्यानी अनेक वर्षे अर्किटेक म्हणून काम केले आहे , आणि अजून ही त्या कार्यरत आहेत . चित्रकारांसाठी त्यानी या गॅलरीच्या माध्यमातून एक उत्तम व्यासपीठ तयार केले आहे . चित्रकथी आर्ट गॅलरी ही चित्रकार ,कला रसिक आणि कला संग्राहक यांना जोडणारे एक उत्तम माध्यम ठरेल यात शंका नाही . ह्या गॅलरी मध्ये १५,१५ दिवसांनी वेगवेगळ्या आर्टिस्ट ची पेंटिंग्स आपल्याला पाहावयास मिळतील .





साजिरी
Sarees and beyond...
PRESENTS
सोनाली पैठणी
अँण्ड सिल्क सारीज्
NOW IN MUMBAI
Vile Parle, East
पैठणी | चंदेरी | लिनन
गडवाल | माहेश्वरी | खण
कॉटन | कांजीवरम | नारायण पेठ
डिझायनर साड्या
+91 9867088877



Shop no A-01 Suvas Apartmen Hanuman Road,
Opp McDonald's Vileparle (East) Mum: - 400057

पान ५ वरून **डोंगरी बालसुधारगृहाचे सुशोभीकरण!**

त्याचे महत्त्व पटवून देण्याच्या दृष्टीने काही ना काही तरी प्रयत्न करायचे. याकरिता मी सर्वप्रथम आमच्या पोलीस अधिकाऱ्यांना आणि अंमलदारांना त्या ऐतिहासिक वास्तूंची माहिती परेड वर करून देऊ लागलो त्यांना उद्युक्त केले की त्यांनी आपल्या कुटुंबीयांसमवेत त्या वास्तूला भेट द्यावी आणि आपला इतिहास माहिती करून घ्यावा त्यानंतर माझ्या वाढदिवसानिमित्त सर्व पोलीस अधिकारी आणि अंमलदारांनी बाल सुधारक यामध्ये जाऊन मुलांच्या समवेत भोजनाचा आस्वाद घेतला आणि काही काळ त्यांच्या बरोबर व्यतीत केला. त्याचप्रमाणे त्या ऐतिहासिक खोल्यांना पण भेट दिली आणि सर्व चालणार नव्हते याकरता सामाजिक जनजागृती करणे आवश्यक होते हे लक्षात घेऊन मी विलेपार्ले येथील ५५ प्रतिष्ठित व्यक्तींची एक सहल आयोजित केली. त्यावेळेस बालसुधारकाचे अधीक्षक म्हणून श्री. राहुल कंठीकर हे कार्यरत होते ते अतिशय सकारात्मक विचार करणारे आणि त्यांच्या मनात देखील ह्या वास्तूचे महत्त्व लोकांपर्यंत पोहोचवण्याची इच्छा होती. त्यामुळे त्यांच्या सहकार्याने या सर्व विलेपार्ल्यातील प्रतिष्ठित लोकांना संपूर्ण बाल सुधारगृहाची सहल घडवली. त्या ऐतिहासिक खोल्यांमध्ये नेऊन लोकमान्य टिळक, आगरकर आणि सावरकर यांच्या



पोलिसांना त्याची महती आणि माहिती दिली. त्यानंतर आमचे पोलीस अधिकारी आणि अंमलदार हे देखील त्यांच्या कुटुंबासमवेत त्यांच्या मुलांच्या वाढदिवसानिमित्त बालसुधारकाला भेट देऊ लागले. एवढे करून तस्वीरीला नमन करण्याची संधी उपलब्ध करून दिली. त्यानंतर डोंगरी पोलीस ठाणे येथे त्यांच्या करता सुग्रास भोजनाचे आयोजन केले होते. पोलिसांकडून असा उपक्रम त्यांना अपेक्षित नव्हता त्याचप्रमाणे असे आदरातिथ्य देखील




त्यांनी अपेक्षित केले नव्हते. या उपक्रमाचा सकारात्मक परिणाम झाला आणि काही व्यक्ती, काही संस्था पुढे आल्या आणि त्यांनी बाल सुधारगृहातील या ऐतिहासिक खोल्यांचे पुनर्जीवन करण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू केले.

या दरम्यान मी स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे नातू श्री. रणजीत सावरकर यांना देखील निमंत्रित केले. त्यांनी सौ. मंजिरीताई मराठे यांच्या समवेत प्रथमच डोंगरी बालसुधारगृहात जाऊन ज्या ठिकाणी सावरकरांना कैद केले होते त्या खोलीचे दर्शन घेतले त्यावेळेस ते खूप भावूक देखील झाले होते.

विलेपार्ले येथील लोकमान्य सेवा संघ आणि स्वातंत्र्यवीर सावरकर आंतरराष्ट्रीय स्मारक समिती, शिवाजी पार्क या दोन्ही संस्थांनी यामध्ये पुढाकार घेतला आणि त्यामध्ये मी समन्वयाचे काम केले. आम्ही त्या दृष्टिकोनातून पावले उचलली, सर्व संबंधितांनी त्या स्थळाला भेट देऊन पाहणी केली, अपेक्षित फेरबदल, सुधारणा करण्याच्या दृष्टीने चर्चा केली, आर्थिक पाठबळाच्या दृष्टीने प्रयत्न केले पण दुर्दैवाने करोना विषाणूची साथ पसरली आणि ते काम तिथेच थांबले.

आता महाराष्ट्र सरकारने पुढाकार घेऊन या वास्तूचे योग्य ते सुशोभीकरण, सर्वसामान्यांसाठी भेट देण्याची सोय आणि इतर सुख सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सुरुवात केली आहे. त्याबद्दल त्यांचे खूप खूप धन्यवाद.

वंदे मातरम !



**(अविनाश धर्माधिकारी)**
निवृत्त पोलीस उपअधीक्षक
महाराष्ट्र पोलीस, मो. न. ९९३०६८५८३१

## अंबरनाथ मराठी फिल्म फेस्टिवल मधे पार्लेकरांचे यश!

डॉ. श्रीकांत शिंदे फाउंडेशन आणि अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ आयोजित ८ व्या 'अंबरनाथ मराठी फिल्म फेस्टिवल २०२३' चा पुरस्कार सोहळा शनिवारी २० मे रोजी संपन्न झाला. या पुरस्कार सोहळ्यात



'समायरा' या चित्रपटाला पाच पुरस्कार प्राप्त झाले आहेत. या चित्रपटाचे दिग्दर्शन पार्ल्याच्या ऋषी देशपांडे यांनी केले आहे तसेच संगीत पार्ल्याच्याच निहार शेंबेकर यांनी केले आहे. या दोन्ही कलावंतांनी उत्कृष्ट दिग्दर्शक व उत्कृष्ट संगीत या पारितोषिकांवर आपले नाव कोरले आहे. सर्व पार्लेकरांतर्फे दिग्दर्शक ऋषी देशपांडे आणि संगीतकार निहार शेंबेकर यांचे अभिनंदन!

## प्रतिकूल परिस्थितीतही आर्यनने मिळवले ९६.४% गुण!

विलेपार्ले येथे राहणारा १६ वर्षांचा आर्यन रहाटे. आयसीएसई बोर्डाच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन करून अनेकांसाठी एक तेजाचा किरण ठरला आहे. १ नोव्हेंबर, २०२२ पासून आर्यन



Acute lymphoblastic leukaemia या कर्करोगाचा सामना करत आहे. १० वी आयसीएसई बोर्डाची परीक्षा सुरू असताना आर्यन सांताक्रूझ येथील सूर्या रूग्णालयात त्याच्या आयुष्यातील कठीण अशी परीक्षा देत होता परंतु या परिस्थितीवर मात करत आर्यनने १० वी आयसीएसई बोर्डाचे तीन पेपर शाळेतून तर तीन पेपर सूर्या रूग्णालयातील बेडवरून दिले. १४ मे, २०२३ रोजी आर्यनचा ICSE १० वी बोर्डाचा निकाल लागला. त्यामध्ये त्याने आलेल्या संकटावर मात करून ९६.४% गुण मिळवून यश संपादन केले. आर्यनच्या या चिकाटीला सर्व पार्लेकरांकडून सलाम.

## डॉ. गिरीश जाखोटिया यांच्या "Economics of Survival" या ग्रंथाचे प्रकाशन !

१९ मे रोजी लोकमान्य सेवा संघाच्या 'पु.ल देशपांडे सभागृह' येथे डॉ. गिरीश जाखोटिया यांच्या 'Economics of Survival' या ग्रंथाचे प्रकाशन झाले. विविध क्षेत्रातील वाचकांची या सोहळ्याला उत्तम उपस्थिती होती. नॅशनल स्टॉक एक्स्चेंजचे वित्तीय प्रमुख श्री. यात्रिक विन यांच्या हस्ते हे




प्रकाशन झाले. जागतिक गोंधळाच्या आजच्या परिस्थितीत या ग्रंथाची प्रखर आवश्यकता त्यांनी विषद केली तसेच मणिपाल विद्यापीठ प्रकाशन संस्थेच्या प्रमुख डॉ. नीता इनामदार म्हणाल्या, ''येत्या कालखंडात हा ग्रंथ आम्हाला खूप मार्गदर्शक ठरेल''. एस व्ही फाटक ग्रंथालयाचे अध्यक्ष डॉ. विवेक भट यांनी या ग्रंथाचे महत्त्व अधोरेखित केले. हा ग्रंथ खालील लिंक वरून मागवता येईल.

https://mup.manipal.edu/product/economics-of-survival-sustainable-inclusive-equitable-prosperity/

# विसरलेले समाज - २ : टुलोर


चिले देशाता अटाकामा असा प्रदेश आहे. जिथे अनेक ठिकाणी गेल्या ५०० वर्षात पाऊसच पडलेला नाही आणि जिथे पडतो तिथेही संपूर्ण वर्षभरात सरासरी फक्त १०-१५ मि.मी. एव्हढाच पडतो. सहारा सारख्या वाळवंटातही अटाकामापेक्षा दहापट अधिक पाऊस पडतो. पण अशा या रखरखाटात सुद्धा जीवन आपला पाय रोवून राहिलेलं आढळतं. ५०० पेक्षा अधिक जातीच्या वनस्पती, आणि त्यांच्या आधाराने जगणारे ग्वानाको आणि वायकुनिया सारखे शाकाहारी प्राणी, टोळ, फुलपाखरं, गांधीलमाशांसारखे कीटक, त्यांच्यावर जगणारे विविध पक्षी, आणि कोल्ह्यासारखे शिकारी प्राणी अशी एक संपूर्ण जीवन-साखळीच पिढ्यानपिढ्या या वैराण वाळवंटात नांदते आहे. अर्थातच या जीवन साखळीत सर्वात वरच्या स्थानावर मनुष्य प्राणीही आलाच.

आज अस्तित्वात असलेले जे १० विविध मानवी समुदाय चिले देशातील मूळ रहिवासी मानले जातात, त्यातील अटाकामेनो किंवा लिकान अंताई वंशाचे लोकं आज सध्या जिथे 'सान पेद्रो द अटाकामा' हे शहर आहे त्या परिसरात राहतात. मात्र या अटाकामेनो समाजाचा ज्ञात इतिहास ख्रिस्तोत्तर ७व्या / ८व्या शतकांपर्यंतच जातो, म्हणजे या भागातील प्रसिद्ध टिवानाकू साम्राज्याच्या सुवर्णकाळापर्यंत. आणि अटाकामेनो संस्कृतीच्या इतिहासात ह्या टिवानाकूच्या प्रभावाच्या स्पष्ट खुणा आजही दिसतात. पण मग ख्रिस्तपूर्व सु. ८००० (अटाकामा मधील मानवी वास्तव्याच्या पहिल्या खुणांचा काळ) ते टिवानाकू ह्या मधल्या काळात इथे काय घडलं?

मी मुळात अटाकामामध्ये गेलो होतो ते एका संपूर्णपणे वेगळ्या प्रदेशातील कधी न अनुभवलेला निसर्ग पाहायला - मून व्हॅली, तातिओ गायझर, रेनबो माउंटन सारखे.आपण चंद्र किंवा मंगळासारख्या परग्रहावरच आहो की काय असं भासविणारे भूप्रदेश **(पहा पहिला फोटो - अटाकामाच्या वाळवंटातील काही दृश्य)** पाहून परतताना आमचा वाटाड्या आम्हाला मून व्हॅली जवळच टुलोर गावाजवळील पुरातन भग्नावशेषांकडे घेऊन गेला आणि निसर्गयात्रे बरोबरच एक वेगळीच सांस्कृतिक सफरही पदरी पडली.



मून व्हॅली नजीकच्या आजच्या वैराण वाळवंटात १० हजार वर्षांपूर्वी फार वेगळी परिस्थिती होती. सान पेद्रो आणि वियामा नद्यांमुळे येथे निर्माण झालेल्या ओऍसिस सारख्या भागात प्राचीन मानवी टोळ्यांनी आपली भटकी/शिकारी (hunter-gatherer) जीवनशैली त्यागून एका जागी स्थिर राहून शेतीवर जगण्याचा मार्ग स्वीकारला. सुमारे ८ ते ९ हजार वर्षांपूर्वी रानटी मका दक्षिण मेक्सिकोमध्ये माणसाळवला (domesticated) गेला आणि पुढील काही शतकात अँडीज पर्वतराजीच्या आश्रयाने राहणाऱ्या टुलोर सारख्या अनेक समाजाचं मुख्य पीक बनला. (आजमितीला ह्या भागात ५५ वेगवेगळ्या जातीचे मके पिकतात!) या शिवाय एतद्देशीय उंटसदृश वंशातील (Camelids) रानटी प्रजाती माणसाळवून त्यांचा शेतीसाठी (किंवा त्यांच्या मांसाचा आणि दुधाचा आपल्या आहारात) उपयोगही टुलोर समाजाने केला असावा. आज दक्षिण अमेरिकेत दिसणारे लामा, किंवा वायकुनिया सारखे प्राणी त्यांचे सध्याचे वंशज.




टुलोरच्या अवशेषांचं सर्वप्रथम नजरेत भरणारं वैशिष्ट्य म्हणजे, त्यांची स्थापत्य-शैली. या आधीही मी अनेक प्राचीन संस्कृतींचे अवशेष पाहिले होते - भारतातील धोलावीरा/लोथल, कंबोडियामधील ख्मेर साम्राज्य, ईजिप्त, सँटोरिनी बेटावरील अक्रोटीरी, अगदी दक्षिण अमेरिकेतीलही नाझ्का, चावीन, वारी, टिवानाकू सारखे अनेक. पण असं, जिथे वर्तुळ हा एकच आकृतिबंध वापरून बांधलेलं सर्व काही आहे - घरं, धान्य साठविण्याची वखार, सभागृह सर्वकाही वर्तुळाकृती, मी कधीच पाहिलं नव्हतं. साबणाचं पाणी खळबळून त्यावर भरपूर सारा फेस काढल्यावर त्या फेसात जसा एकमेकाला चिकटलेल्या वेगवेगळ्या मापाच्या पण फक्त वर्तुळाकृती बुडबुड्यांचा समूह दिसेल अगदी तसच हे गाव दिसत असलं पाहिजे. **पहा दुसरा फोटो (मी काढलेला) आणि तिसरा,** ह्या गावाच्या नकाशाचा फोटो (या ठिकाणी उत्खनन करणाऱ्या शात्रज्ञांनी बनविलेला). पण हे गाव नांदतं असताना कसं दिसत असेल? पहा चौथा



फोटो, उत्खननात सापडलेल्या भग्नावशेषांचा वापर करून बनविलेल्या घरांच्या प्रतिकृतीचा. तिसरा (नकाशाचा) आणि हा **चौथा फोटो** जर एकत्रित निरखून पहिला तर येथील स्थापत्याचं आणखी एक वैशिष्ठ्य तुमच्या लक्षात येईल -



देशोदेशी

गावातील बहुतेक इमारती, आच्छादित बोळकांड्यानी एकमेकाला थेट जोडलेल्या होत्या. आपल्या घरातून गावाच्या चावडीवर जायचं असेल तर घराबाहेर रस्त्यावर जायला नको! ह्या बोळकांड्या वापरून शेजाऱ्यांच्या घरातून थेट जायचं!

संपूर्ण गावही उंच तटबंदीने वेढलेलं असणार. मात्र ही तटबंदी वायव्येकडील वाळवंटावरून वाहत येणाऱ्या वावधुळीपासून गावाचं संरक्षण करण्याकरिता बांधलेली असावी. कारण ह्या प्रदेशात ज्यांच्यापासून संरक्षणाची गरज भासावी असे कुठलेही हिंस्र प्राणी कधीच नव्हते.

एकूणच टुलोरचं स्थापत्य आणि बांधकामाचं तंत्र (मातीच्या विटा आणि घुमट (Self-Supporting vaults)पाहून एक अंदाज असा आहे की, बोलिव्हियातील ओरुरो विभागातील वांकारानी टोळ्या सुमारे ख्रिस्तपूर्व ५-६ व्या शतकात टुलोर येथे स्थलांतरीत झाल्या असाव्या कारण, त्यांच्याही घरं /गावांची रचना टुलोरशी मिळती-जुळती आहे. (आजही ओरुरो प्रांतात ग्रामीण भागात अश्या प्रकारची घरं दिसतात.)

टुलोर मध्ये साधारण ख्रिस्तपूर्व ४०० ते ख्रिस्तोत्तर २०० वर्षांपर्यंत वस्ती असावी असं आजपर्यंत मिळालेल्या अवशेषांवरून वाटतं. पण त्यावरून या समाजाबद्दल - त्यांच्या चालीरीती, तंत्रज्ञान, धर्मविचार, राजकीय संस्था अशा कुठल्याही बाबतीत नक्की अनुमान काढता येत नाही. उत्तम दर्जाच्या कुंभारकामाचे नमुने या अवशेषांत मिळाले आहेत. **(पहा पाचवा फोटो)**, तसचं दगडांपासून बनविलेली अवजारं - धान्य दळायची जाती, जमीन खणायची फावडी, सुऱ्या इत्यादी जरी मिळाले असले तरी, धातूच्या वस्तू बनविण्याची कला त्यांना कितपत अवगत होती ते नक्की सांगता येत नाही. मिळालेल्या काही थडग्यातील अवशेषांवरून मुद्दाम कृत्रिम रित्या (उदाहरणार्थ, डोक्याच्या दोन्ही बाजूला कायम घट्ट फळ्या बांधून) डोक्याच्या कवटीचा आकार निमुळता बनवण्याची पद्धत प्रचलित होती असं दिसतं. मात्र या मागे काही धार्मिक कारण होतं की काही सौंदर्य विचार होता (जसं ब्रह्मदेशातील काही



आदिवासी समाजात स्त्रियांची मान मुद्दाम धातूच्या कड्या लहानपणापासून घालून लांब केली जात असे) ते सांगता येत नाही.


येथे सापडलेल्या वस्तू (उदाहरणार्थ ऑब्सिडीयन किंवा मॅलाकाइट सारख्या या परिसरात न मिळणाऱ्या दगडांच्या वस्तू, धातूची अवजारे, टुलोरच्या कुंभारकामा पेक्षा वेगळे तंत्र वापरून केल्यासारखी वाटणारी भांडी इ.) पाहून येथील उत्खनन करणाऱ्या शात्रज्ञांच्या मते टुलोरकरांचा व्यापारी/सामाजिक संबंध चिलेचा समुद्रकिनारा, बोलिव्हियातील पठारं किंवा अँडीज पर्वतराजी पलीकडला आजचा अर्जेन्टिना अशा दूर दूर च्या समाजांशी असला पाहिजे.

साधारण ख्रिस्तोत्तर २०० च्या सुमारास सान पेद्रो नदीचा मार्ग झपाट्याने बदलत गेला आणि त्यामुळे येथे पाण्याचं दुर्भिक्ष निर्माण होऊन, तसचं वायव्येला पूर्वीपासूनच असलेल्या वाळवंटाचं आक्रमण वाढून हा सारा परिसर बहुधा शेतीला आणि म्हणून मनुष्य वस्तीला निकामी झाला असावा. प्रचलित समजुतीनुसार येथील समाज येथून परागंदा होऊन दुसरी कडे स्थायिक झाला आणि आजचा अटाकामेनो समाज हे त्यांचेच वंशज आहेत.

मात्र १९५६ साली 'रेव्ह. गस्टावोल पेज.' ह्या पुरातत्वशास्त्रज्ञाने टुलोरचे अवशेष शोधून काढेपर्यंत, ह्या पूर्वसूरींची स्मृती पूर्णपणे पुसून गेली होती!

प्रत्यक्ष भेटीत स्थानिकांकडून जे मी ऐकलं त्याला पूरक म्हणून ज्या दोन शोधनिबंधांचा मी मुख्यत: आधार हे लिहिण्यासाठी घेतला त्यांच्या त्व्हळ खाली दिल्या आहेत. त्यातील पहिला निबंध स्पॅनिश भाषेत असल्यामुळे वाचण्या आधी तुम्हाला Google Translate च्या मदतीने त्याचं इंग्रजीत भाषांतर करून घ्यावं लागेल.

1. http://www.chungara.cl/Vols/1986/Vol1-17/Tulor_posibilidades_y_limitaciones_de_un_ecosistema.pdf
2. http://www.chungara.cl/Vols/2010/Vol42-2/02-NUNEZ-CHUNGARA-42-2.pdf



**सतीश जोशी**
९८२०२२८२७९

# नीला रवीन्द्र - एक चालतं बोलतं सांस्कृतिक केन्द्र

स्वर आणि स्वरसोहळ्यातील काही माणसं आपल्याला खूप आवडतात. वयोमानानुसार त्यांच्या भेटी गाठी दुर्मिळ होतात. पण मनाच्या ठेवणीतल्या शालीत ती घट्ट गुरफटलेली असतात.अशी माझी लाडकी सखी म्हणजे नीला. म्हणजेच नीला रवीन्द्र आपल्या आवाजा



इतकंच गोड आणि लाघवी व्यक्तीमत्त्व लाभलेली नीला यंदा वयाच्या ७५ रीच्या उंबरठ्यावर उभी आहे. तिचा गेल्या ५५ वर्षाच्या सांगितिक आणि सांस्कृतिक प्रवास ही तिची आयुष्यातील फार मोठी कमाई आहे.गेले ४०/४२ वर्षे नीलाची ही कारकीर्द मी जवळून बघते आहे, अनुभवते आहे. शिक्षण, कला आणि व्यक्तीमत्त्व विकास यांचे महत्त्व जाणणारे आणि कडक शिस्तीचे आई वडिल (सुधा आणि गंगाधर जोशी) नीलाला लाभले.

विलेपार्ल्यासारख्या सुसंस्कारित, सांस्कृतिक गावात ती वाढली. हे तिच्या जडणघडणीचे बलस्थान !

पार्ले टिळक विद्यालय आणि पार्ले कॉलेज (सध्याचे साठ्ये कॉलेज) मधून नीलाचे शिक्षण झाले. फिलॉसॉफी या विषयात तिने एम.ए ची पदवी संपादन केली. (काही दिवस तिच्या वडिलांच्या इच्छेखातर लेक्चरशिप ही केली.) पं. शंकर अभ्यंकर हे नीलाचे संगीतातले गुरु. पार्श्वगायक जयवंत कुलकर्णी हे तिचे मामा.




नीलाची संगीत क्षेत्रातील व्यावसायिक कारकीर्द कॉलेजमध्ये शिकत असतानाच सुरू झाली. संगीत दिग्द. वसंत देसाई, सी. रामचंद्र, नारायण दत्त, बुलो सी रानी, जयदेव यांच्यासारख्या नामवंत दिग्गज संगीतकारांकडे तिला गाण्याची संधी मिळाली आणि त्या संधीचं तिने सोनं केल.

लग्नानंतर नीला जोशी ही नीला रवीन्द्र भिडे झाली. नीलाच्या कलागुणांचे मोल जाणणारा तिला साथ देणारा रवीन्द्र सारखा जोडीदार लाभला आणि नीलाचा प्रवास उत्तरोत्तर बहरत गेला.विविध प्रांतात काम करण्याची संधी तिला लाभली.

जिंगल म्हणजे काही सेकंदाचे जाहिरातीचे गाणे. सं.दिग्द अशोक पत्की यांचे पहिले जिंगल 'ये ढेरसे कपडे मै कैसे धोऊं' हे गाण्याची संधी तिला मिळाली आणि तिने त्या संधीचं सोनं केल. हे जिंगल खूप गाजलं. जवळ- जवळ ३० वर्षे रेडिओवर सतत वाजत राहिले. पुढे हा सिलसिला असाच सुरु राहिला आणि नीलाने ४०० जिंगल्स विविध भाषांमध्ये गायिली.

लोक तिला 'जिंगल क्वीन' म्हणून




ओळखायला लागले.

१९८० च्या सुमारास सुलभा देशपांडे यांच्या अविष्कार या नाट्य संस्थेतर्फे 'दुर्गा झाली गौरी' हे नृत्यनाट्य रंगभूमीवर आले.अविष्कार चंद्रशाळेचा हा सर्वांग सुंदर कलाविष्कार खूप गाजला, अजरामर झाला.त्याचे संगीत शांक नील यांनी दिले होते. माझी मुलगी छोटी निशिगंधा त्यात काम करत होती.

'बाई हा नंदाचा खट्याळ पोर' या नीलाच्या आवाजातल्या खट्याळ गोडव्याच्या मी प्रेमात पडले.मी एक लेख ही लिहिला.

'बंगाली मिठाईचा गोडवा'. नीला रवीन्द्र तो लेख. २९ ऑक्टोबर १९८२ च्या महाराष्ट्र टाईम्स मध्ये छापून आला होता.

पुढे नीला प्री रेकॉर्डेड कॅसेटच्या क्षेत्रात उतरली आणि प्रथमेश ऑडिओ प्रॉडक्ट या बॅनरखाली प्री रेकॉर्डेड कॅसेटच्या निर्मितीला सुरुवात झाली. या क्षेत्रातील नीला पहिली मराठी स्त्रीनिर्मिती आहे. याचा मला खूप अभिमान आहे. बालदोस्तांसाठी तिने माझ्या गोष्टींच्या तीन कॅसेटस् केल्या.'हट्टी राणी आणि कपिल देव', 'अबु आणि ढब्बु' आणि 'चिकी मिकी चिंग चँग'. प्रशांत दामले, निशिगंधा वाड, दिलीप प्रभावळकर यांच्या आवाजात त्या गोष्टी ध्वनिमुद्रित केल्या. बाल दोस्तांना त्या खूप आवडल्या. नीलाचं आणि माझ नातं दिवसेंदिवस अधिकच घट्ट होत गेलं.पुढे मी जेव्हा महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाची अध्यक्षा झाले. तेव्हा 'बोलका विश्वकोश' आणि 'कुमार विश्वकोश' या दोन खंडांसाठी तिने शिर्षक गीते करून दिली.

एवढंच नाही तर या गाण्यातील समूह गायनासाठी तिने दादरच्या कमला मेहता अंधशाळेच्या गाणाऱ्या विद्यार्थिनींची निवड केली.काही दिवस त्या अंधशाळेत जाऊन नीलानी त्या मुलींना गाणी शिकवली आणि रेकॉर्डिंगसाठी त्यांची तयारी करून घेतली. अशी ही नीला मला खूप भावते.

सं. दिग्द अनिल मोहिले यांनी संगीतबद्ध केलेली प्रथमेशची पहिली भावगीतांची कॅसेट मैफिल ही मा. बाळासाहेब ठाकरे यांच्या हस्ते मा. सुशीलकुमारजी शिंदे, ज्येष्ठ गायिका शोभा गुर्टु यांच्या उपस्थितीत नीलाच्या भिडे बंगल्याच्या गच्चीवर १९८४ साली प्रकाशित झाली. मैफिल हा सुगम संगीताचा कार्यक्रम दीनानाथ नाट्यमंदिरात स्वर सम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या आशिर्वादपर उपस्थितीने आणि पं. हृदयनाथ मंगेशकर यांच्या सन्माननीय सहभागाने संपन्न झाला हे प्रथमेशचे भाग्य.



पं.हृदयनाथ मंगेशकर रवीन्द्र भिडे नीला रवीन्द्र

पुढे मा. बाळासाहेब ठाकरे, पं. हृदयनाथ मंगेशकर आणि ज्येष्ठ पत्रकार आणि निर्भिड वक्ते माधवराव गडकरी यांच्या पाठबळाने प्रथमेश कला केंद्राची घोडदौड सुरु झाली. संगीत, नाटक, चित्रपट, साहित्य व समाजकार्य अशा विविध क्षेत्रातील दिग्गज व्यक्तींना एकाच



वेळी एकाच रंगमंचावर आणण्याची किमया नीला तिचे पती रवीन्द्र भिडे आणि समविचारी कलावंत मित्र अविनाश प्रभावळकर या त्रयींनी करून दाखविली आणि पारले गावात सप्तरंगी मैफिलींची मांदियाळी सुरु झाली.

नीलाच्या सांगितिक प्रवासातील मानाचा तुरा म्हणजे जर्मनीत रिमिक्ससाठी ध्वनिमुद्रित झालेला तिचा आवाज. गायक मित्र परेश पेवेकरांबरोबर अमेरिका आणि जर्मनी येथे चॅरिटी शो साठी गेलेली असताना जर्मनीतील एका स्टुडिओत तिचा आवाज ध्वनिमुद्रित केला गेला.नीलाचे संगीतातील गुरु पं.शंकर अभ्यंकर यांच्या बंदिशीचा मुखडा 'रे बलमवा' हा स्नॅप म्युझिक कंपनीने रिमिक्ससाठी वापरला.त्याचा एक सुंदर व्हिडीओ तयार केला. चॅनल 'M'




आणि चॅनल 'V' वरून तो जगभर गेला.गुगल आणि व्हिकीपिडियात 'Vocals by indian vocalist neela ravindra'अशी नोंद आहे.

नीला आणि रवीन्द्र यांनी सामाजिक बांधिलकी प्रयत्नपूर्वक जपली आहे. काही सामाजिक संस्थांमधून आज ही ते कार्यरत आहेत.अनाथ मुले व गरीब गरजू विद्यार्थी तसेच समाजातील दुर्बल घटक यांना ते नेहमी मदत करत असतात.थोर समाजसेविका अनुताई वाघ यांच्या सेवाभावी कार्यात यथाशक्ती मदत केली आहे. मधुभाई सावंत यांच्या 'I Clean Mumbai' या पर्यावरण विषयक कार्य करणाऱ्या संस्थेचे नीला व रवीन्द्र विश्वस्त म्हणून बरेच वर्ष कार्यरत होते.

अलिकडे नीलाने 'Neela Ravindra' हा तिचा यु ट्युब चॅनल सुरु केला आहे.स्वरबंध आठवणींचे, कविता आठवणीतल्या आणि मेरा भारत महान या मालिकांमधून विविध विषयांवरील व्हिडिओ तिच्या चाहत्यांना पहायला मिळतात.

नीला तुझा हा प्रवास समृद्ध होत जावो हाच आशिर्वाद !

डॉ.विजया वाड
(ज्येष्ठ लेखिका आणि माजी अध्यक्षा
महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश मंडळ.)
९८२०३ १६६९७

# ‘मृत्यूपत्र’ (‘वसियत’)

‘मृत्यूपत्र’ ही मूळ कविता हिंदीतील ‘वसियत’ या शीर्षकाची आहे. या कवितेची गोष्ट खरं तर माझ्या आयुष्यातील एका गमतीदार प्रसंगाशी निगडित आहे. तुमच्याही आयुष्यात असा प्रसंग येऊ शकतो म्हणून हा प्रपंच. या हिंदी कवितेचं मराठीतील रूपांतर ( भाषांतर नव्हे ) येथे केवळ एक उपचार म्हणून प्रस्तुत केलंय.

‘वसीयत’ म्हटलं कि एकदम हिंदी सिनेमातील न्यायालयात शिरल्या सारखं वाटत जिथे या शब्दाचे भाऊबंद वाटतील असे ‘मुझरिम ’, ‘मौका ए वारदात’, ‘सुराग ’ इत्यादी इत्यादी. अनाकलनीय शब्दांचे रंगीबेरंगी बुडबुडे वातावरणात तरंगत असतात. तर ‘मृत्यूपत्र’ म्हटलं कि थेट एखादी मराठी रहस्यमय कादंबरी आठवते. थोडक्यात काय तर या शब्दाचा आपल्या स्वत: च्या संदर्भात विचार डोक्यात येणे हे आपल्याला ‘कौन बनेगा करोडपती’ मधील ५ करोडच्या शेवटच्या प्रश्नाचे बरोबर उत्तर आधीच माहित असण्या एवढं अशक्यप्राय आहे. त्यामुळे माझ्या एका मित्राने मला एकदम ‘‘काय रे तू तुझं मृत्यूपत्र बनवलं आहे कि नाही ?’’ असा प्रश्न विचारल्यावर मी तर उडालोच. बरं त्याचा आविर्भाव इतका सहज होता कि ‘‘काय रे कधी पतंग उडवला आहे कि नाही ?’’ हा प्रश्न त्याच्यापुढे गंभीर वाटावा.

‘‘नाही बुवा. का रे ?’’.मी चाचरलो.


‘‘काही नाही. सहजच. मी केलंय ’’

‘‘तू सहजच मृत्यूपत्र केलंयस ?’’

‘‘तसं नाही. पण नाही केलं तर नंतर खूप त्रास होतो मागच्या लोकांना असं ऐकलंय .कोर्ट कचेऱ्या वगैरे. कधीतरी करावच लागणार ना आणि मध्यंतरी तर तू बघितलच आहेस कोविड मुळे काय झालं ते.’’

अरे बापरे !! मलाही त्याचं आता पटू लागलं. अजून काय काय उलथा पालथ करणार आहे हा कोविड आपल्या आयुष्यात कोण जाणे असं म्हणून मीही कामाला लागलो माझं ‘मृत्यूपत्र’ बनवायच्या. आणि मग एकेक मूलभूत प्रश्न अंगावर चालून येऊ लागले. किती पानी करायचं ? प्रत्येक पानावर सही करायची का एखाद्या करारावर करतात तशी ? काही राहून गेलं तर काय ? ते कायदेशीर कसं करायचं असतं ? कुठं नोंदणी करायची असते ? एक ना दोन. त्यामुळे हे काम सतत पुढं जाऊ लागलं.


मग काही दिवसांनी मला असा शोध लागला कि हे काम पुढं ढकलण्या मागचं माझं खरं कारण वेगळंच होतं. ते म्हणजे स्वत: चं मृत्यूपत्र लिहिण्याची माझी मानसिक तयारीच होत नव्हती. उगीचच व्यवहारिक कारणं पुढे करून मी स्वत: लाच फसवत होतो. नट कल्पक असतो म्हणे पण आता माझ्यातल्या तथाकथित कल्पक नटाला (कि माणसाला कोण जाणे) ‘माझ्या मृत्यू नंतर ’ ही कल्पनाच करता येत नव्हती. परकाया प्रवेश परवडला पण स्वकाया निर्गमना ची कल्पना करताना माझ्या कल्पकतेची सूरी पार बोथट झाली होती. नुसती कल्पकताच नाही तर आपण नसल्याची नुसती कल्पना करायलाही हिम्मत लागते. महाभारतातील ती कथा मला आठवली. ज्या कथेत ‘‘जगातील सर्वात मोठं आश्चर्य कोणतं ?’’ या यक्ष प्रश्नाचे युधिष्टीराने दिलेले ‘‘प्रत्येकाचा मृत्यू अटळ आहे आणि तरीही प्रत्येकाचं वागणं हे अमरपट्टा घेऊन आल्यासारखं असतं’’. हे समर्पक उत्तर मला अगदी मनोमन पटलं.



पण काही दिवसांनी मला अजून एक कारण कळलं माझ्या टाळाटाळीच. माझ्या मनाच्या तळघरात, खोलवर कुठं तरी अडगळीत एक आशंकेचा उंदीर खुडबुडत होता आणि माझं मन कुरतडत होता . तो म्हणजे ‘‘मागे काही ठेवून जावं असं खरंच काही आपण कमवलय का ?’’ व्यावहारिक मौल्यवान गोष्टी एकवेळ जाऊ देत. पण आपल्या काही चांगल्या कामांच्या खुणा, विचारांचे ठसे, प्रयत्नांची दिशा, कुणासाठी काही प्रेरणा ? की आपलं सगळंच आयुष्य निव्वळ स्वत: च्याच धुंदीत उथळ धम्माल करण्यात गेलं ? आणि मग अचानक मला ‘वसीयत’ या नितांत सुंदर कवितेची आठवण झाली. त्याच कवितेच मराठी रूपांतर इथे प्रस्तुत करतोय.

(त्याआधी एक टिप्पणी : गेली काही वर्ष मला पाठ असलेली ‘वसियत’ ही कविता अमृता प्रीतम यांची आहे असाच माझा समज होता. पण मी गुगल वर पाहिलं तेव्हा ही कविता अमृता प्रीतम व बाबुशा कोहली (प्रेम गिलहरी दिल अखरोट कविता संग्रह) या दोन्ही प्रख्यात कवियत्रीच्या नावावर दाखवण्यात येते. पुढील अनावश्यक (माझ्या मते) शहानिशा करण्याच्या भानगडीत न पडता या दोन्हीही थोर कवियत्रीना अभिवादन करून मी ही कविता इथं सादर करतोय. कवी हा जवळ जवळ प्रतिपरमेश्वर असतो असं मी मानतो. व म्हणूनच आजवर कोणतीही कविता ही कवीच्या सादर नामोल्लेखाशिवाय प्रस्तुत केली नाहीये म्हणूनच हा टिप्पणी प्रपंच. नदीचे मूळ व ऋषीचं कूळ शोधू नये म्हणतात कारण शेवटी ऋषीनं त्याच्या आश्रमात व नदीने तिच्या काठी किती जीवन फुलवलं हे जास्त महत्वाचे नाही का ?

पूर्ण शुद्धीत, नशा पाणी न करता
लिहीते आहे मी आज
हे माझे मृत्युपत्र
मी मेल्यावर
खोली धुंडाळा माझी
उलथं पालथं करा सगळं घर
कडीकुलुप नाहीच कशाला
सगळं अस्ताव्यस्त पसरलंय
देऊन टाका कुणाकुणाला
माझी स्वप्ने देऊन टाकाटाका
चूलमूल आणि शेजसंगत
यातच मिटून गेलेल्या
तमाम बायकांना
आपल्याच जगात हरवल्यात बिचाऱ्या
युगे झाली विसरुन गेल्यात स्वप्न
पहायला
वाटून टाका
माझं खळाळतं हास्य
वृद्धाश्रमातल्या म्हाताऱ्यांना
अमेरिकेतल्या झगमगाटी शहरात
मुलं हरवलीत त्यांची
टेबलावर बघा
काही रंग दिसतील
त्या रंगांनी रंगवा
त्या विधवा पत्नीची साडी
जिच्या पतीच्या रक्ताने
देशाची सीमा रंगलीय
तिरंग्यात लपेटून
काल झोपी गेलाय तो
माझे अश्रू आहेत ना
ते त्या सगळ्या कविजनांना द्या
एकेका थेंबाची होईल एकेक गजल
गळ्याशप्पथ
माझा सन्मान माझी प्रतिष्ठा ,
त्या वेश्येसाठी राखून ठेवलीय
मुलीला शिकवता यावं म्हणून
तिने देहाचा बाजार मांडलाय
या देशातील सगळे तरुण
पकडा एकेक करुन
प्रत्येकाच्या दंडात टोचा
माझा आक्रोश
क्रांतीचा एल्गार होईल तेव्हा
त्यांना गरज पडेल त्याची
आणि हे माझं वेडेपण आहे ना
ते त्या सूफीच्या वाट्याचं
घरदार सोडून निघालाय तो
ईश्वराच्या शोधात
बस्स एव्हढंच.
बाकी उरेल
माझी असूया
माझी लालसा
माझा संताप



प्रसाद आठल्ये
९८२०६ १३४४५

# गेमाडपंथी

दिवसेंदिवस वेब सिरीज हा प्रकार खूप लोकप्रिय होत आहे आणि प्लॅनेट मराठी या ओटीटी प्लॅटफॉर्मवर वैविध्यपूर्ण वेब सिरीज प्रदर्शित होत आहेत. जून महिन्यात २ जूनपासून दर शुक्रवारी प्रेक्षकांना प्लॅनेट मराठी ओटीटीवर 'गेमाडपंथी ' ही नवी कोरी ओरिजिनल वेब सिरीज पाहता येणार आहे. 'गेमाडपंथी' हे नाव ऐकून आपल्याला आश्चर्य वाटते. ही कोणती नवीन शैली ? तर दगड एकमेकांच्या डोक्यात घालून केलेल्या गेमची एक शैली. ही शैली नेमकी काय आहे ? तर याचे उत्तर तुम्हाला या वेब सिरीज मधून मिळणार आहे. प्लॅनेट मराठी ओरिजनल, दि फिल्म क्लिक स्टुडिओज प्रस्तुत व संतोष कोल्हे दिग्दर्शित या वेबसीरिजमध्ये चैतन्य सरदेशपांडे, पूजा कातुर्डे, प्रणव रावराणे, उपेंद्र लिमये, नम्रता संभेराव, समीर पाटील, दिगंबर नाईक, सविता मालपेकर, अंकुर वाडवे,मीरा सारंग अशी तगडी स्टारकास्ट आहे.

या वेब सीरिजचा ट्रेलर पाहून मनात उत्सुकता निर्माण होते. ट्रेलरमध्ये चिकूच्या किडनॅपिंगचा प्लॅन बनताना दिसत आहे. आता हा चिकू कोण ? आणि त्याला का किडनॅप करत आहेत. याशिवाय हनीच्या लिपस्टिक लावण्यामागचं नेमक रहस्य काय ? याची उत्तरं या वेब सिरीज मधून मिळतील. दिग्दर्शक संतोष कोल्हे म्हणतात, ''टिझर पाहून अनेकांनी मला फोन, मेसेज केले. काय आहे नक्की 'गेमाडपंथी' ? यातील विविध पात्रं एकमेकांचा गेम करत




असतानाच स्वत:च एखाद्या गेमचे शिकार बनत आहेत. आता हे गेम कसे होत आहेत आणि 'गेमाडपंथी' नक्की काय आहे, हे प्रेक्षकांना वेबसीरिज पाहताना कळेलच.'' 'गेमाडपंथी' बद्दल प्लॅनेट मराठीचे प्रमुख, संस्थापक अक्षय बर्दापूरकर म्हणतात, ''ही वेबसीरिज शहरी आणि ग्रामीण अशा दोन्ही प्रेक्षकांना आवडेल अशी आहे. 'गेमाडपंथी' म्हणजे विनोद, रहस्य, प्रेम, थ्रिल असे संपूर्ण पॅकेज आहे. यातील सगळेच कलाकार उत्तम विनोदवीर आहेत आणि या कलाकारांपैकी अनेकांनी पहिल्यांदाच अशा प्रकारच्या बोल्ड भूमिका साकारल्या आहेत.''




# बटरफ्लाय

आपल्या प्रत्येकाचं एक दैनंदिन आयुष्य हे ठरलेलं असतं आणि आपण तसंच ते जगत असतो. पण एक दिवस मेघाच्या आयुष्यात एक अशी रंजक गोष्ट घडते ज्यामुळे तिचे दैनंदिन आयुष्य बदलून जाते. तिला सापडलेल्या एका नवीन वाटेला आणि स्वत:ला ती अधिक प्राधान्य देते. आयुष्याला कलाटणी मिळून कोषातून बाहेर पडून जगणाऱ्या तिची गोष्ट म्हणजेच 'बटरफ्लाय' हा चित्रपट. हा चित्रपट याच महिन्यात प्रदर्शित होतोय. ज्येष्ठ अभिनेते, नाट्यनिर्माते अजित भुरे यांनी 'बटरफ्लाय' हा चित्रपट प्रस्तुत केला असून असीम एंटरटेन्मेंट आणि ॲप्रोग्रॅम स्टुडिओज यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे.

अजित भुरे, अभिजित साटम, मधुरा वेलणकर-साटम हे या चित्रपटाचे निर्माते आहेत. मधुरा वेलणकर- साटम यांच्या संकल्पनेला विभावरी देशपांडे यांनी कथेत बांधले आहे. विभावरी देशपांडे आणि मीरा वेलणकर यांनी पटकथा लिहिली आहे, तर कल्याणी पाठारे, आदित्य इंगळे यांनी संवाद लेखन केले आहे तसेच वासुदेव राणे यांनी या चित्रपटाचे छायांकन केले आहे. या चित्रपटात मधुरा वेलणकर-साटम,अभिजित साटम, महेश मांजरेकर, राधा धारणे, सोनिया परचुरे, प्रदीप वेलणकर असे उत्तम स्टारकास्ट आहे. सां सारगाड्यात रमलेल्या होममेकरच्या




स्वप्नांची गोष्ट उलगडणारा बटरफ्लाय हा चित्रपट नक्कीच आपल्याला आवडेल. यातील 'कोरी कोरी झिंग हाय गं' हे गीत खूप लोकप्रिय होत आहे. वैभव जोशी हे या गाण्याचे गीतकार असून शुभाजित मुखर्जी यांनी ते संगीतबद्ध केले आहे .

सुप्रसिध्द गायिका वैशाली भैसने- माडे हिने हे गीत गायले आहे .



**गणेश आचवल**
९८२१२६८३९१

